सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं/३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/ प्र. क्र.०८/ई-९३२८९७/ पोल-३,दि.१०/०९/२०२५.

**विषय** :- सीसीटीएनएस प्रकल्पासाठी संगणक व सहसामुग्री M/s. Prostram Info System Ltd.] Mahape यांचे कडुन खरेदी करण्याक ता रु.१५८,६७,५८,०२५ /-इतक्या रकमेस वित्तीय मान्यता देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक संकीर्ण- ३६२५ / प्र. क्र.०८ / ई- ९३२८९७ / पोल -३, दि.१०/०९/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९१०१८३८२०५१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 12-09-2025 18:15:42

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**सीसीटीएनएस प्रकल्पासाठी संगणक व सहसामुग्री M/s. Prostram Info System Ltd., Mahape यांचेकडून खरेदी करण्याकरिता रू. १५८,६७,५८,०२५/- इतक्या रकमेस वित्तीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-३६२५/प्र.क्र.०८/ई-९३२८९७/पोल-३,**
मंत्रालय, २ रा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १०/०९/२०२५

**वाचा :-** १) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दि. २६.११.२०२४
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-६/पोल-३, दि. १२.१२.२०२४
३) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६२५/प्र.क्र.९५/ई-१११६६१६/पोल-३, दि. ०२.०६.२०२५
४) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.०१.०८.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांचे पत्र क्र.पोमसं/१७-अ/६१६२/ सीसीटीएनएस साधनसामुग्री खरेदी/२६/२०२५, दि. २८.०८.२०२५.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत राज्यात सीसीटीएनएस प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत सन २०१५ मध्ये राज्यातील १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरिष्ठ पोलीस कार्यालय CAS (Core Application Software) सॉफ्टवेअरव्दारे जोडण्यात आले असून सदर कार्यालयांमध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जोडण्यात आलेल्या १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरीष्ठ कार्यालयामध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सन २०१८ पर्यंत सदर प्रकल्प हा केंद्र पुरस्कृत होता. तद्नंतर सदर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींकरीता येणारा खर्च राज्य शासनामार्फत करणे आवश्यक आहे.

२. Existing Hardware replacement cost is subjected to verification from DIT, GoM(as per discussion point III) च्या अनुषंगाने सीसीटीएनएस प्रणाली अंतर्गत संगणक व सह सामुग्री यांचे खरेदी करीताच्या Appointment of an Agency for Supply, Installation, Commissioning and Maintenance of CCTNS IT Infrastructure (Desktop, UPS Printer, Document Scanner, Network Component, Hard Disk and Miscellaneous Item) Request for Proposal (RFP) प्रसिध्द करणे व त्याकरीता रु.१६१.१७ कोटी निधीस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा निर्णय संदर्भाधीन क्र. १ येथील दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच, सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव

यांच्या अध्यक्षतेखालील दि.१८.९.२०२४ च्या राज्य शिखर समिती (SAC) च्या बैठकीतील निर्णयानुसार सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२४-२५ करीता रु.२२०,३१,६१,०००/- इतक्या Committed व Non Committed खर्चास संदर्भाधीन क्र. २ येथील दि. १२ डिसेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

३. सीसीटीएनएस प्रकल्प राज्य शिखर समिती (SAC) च्या करिता दि.१२ मार्च, २०२५ रोजी झालेल्या राज्य शिखर समिती (SAC) च्या बैठकीमध्ये सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत सन २०२४-२०२५ व सन २०२५-२०२६ करिता, नेटवर्क कनेक्टीव्हीटी, सिस्टीम इंटीग्रेटर, क्लाऊड चार्जेस, प्रकल्प सल्लागार, हार्डवेअर खरेदी, SMS व Customization यांचे रु.३२६.५८ कोटी इतक्या अपेक्षित खर्चाला संदर्भाधीन क्र. ३ येथील दि. ०२ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

४. उपरोक्त दि. २६ नोव्हेंबर, २०२४ व दि. ०२ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता विचारात घेऊन सीसीटीएनएस प्रणालीसाठी आवश्यक संगणक व सहसामुग्री खरेदी करण्याकरिता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयामार्फत ई- निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. या निविदेमध्ये सहभागी झालेल्या निविदाकारापैंकी तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेल्या निविदाकारापैंकी M/s. Prostram Info System Ltd., EL-79, TTC Industrial Area, Mahape, Navi Mumbai-400710 Email- sales@prostarm.com यांच्यांकडून आर्थिक लिफाफ्यामध्ये प्राप्त झालेले दर हे न्यूनतम असल्याने दि. ०१ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या राज्य शिखर समितीच्या बैठकीमध्ये त्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्य शिखर समितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सीसीटीएनएस प्रकल्पासाठी संगणक व सहसामुग्री M/s. Prostram Info System Ltd., Mahape यांचेकडून खरेदी करण्याकरिता रू. १५८,६७,५८,०२५/- इतक्या रकमेस वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

सीसीटीएनएस प्रणालीसाठी आवश्यक संगणक व सहसामुग्री M/s. Prostram Info System Ltd., EL-79, TTC Industrial Area, Mahape, Navi Mumbai-400710 Email- sales@prostarm.com यांच्यांकडून खरेदी करण्याकरिता रू. १५८,६७,५८,०२५/- (रू. एकशे अठ्ठावन्न कोटी सदुसष्ठ लाख अठ्ठावन्न हजार पंचवीस) (सर्व करांसह) इतक्या रकमेस वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सीसीटीएनएस प्रकल्पाकरिता संगणक व सहसामुग्रीची खरेदी करणे व त्या साहित्यांची पाच वर्षाच्या कालावधीकरिता देखभाल दुरूस्ती (O&M) करणे तसेच, त्याकरिता आवश्यक तो IT Helpdesk Support देणे यासाठी M/s. Prostram Info System Ltd., Mahape यांची पुरवठादार म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाने यासंदर्भात संबंधित पुरवठादार M/s. Prostram Info System Ltd., Mahape यांच्यांशी योग्य तो करारनामा करून कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

४. उपरोक्त खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) १४ गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (राज्य योजना), दत्तमत, (२०५५ए०९७), ५०- इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या प्रशासकीय विभागाला प्राप्त वित्तीय अधिकारानुसार तसेच मा.मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली सीसीटीएनएस प्रकल्प राज्य शिखर समिती (SAC) च्या दि.०१.०८.२०२५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९१०१८३८२०५१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.09.10 18:39:18 +05'30'

**(रा.ता. भालवणे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (नि व सं), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१७. प्रकल्प संचालक, मे. विप्रो प्रा.लि., मुंबई.

१८. प्रकल्प संचालक, मे. पीडब्ल्युसी कंपनी, मुंबई.
१९. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
२०. कक्ष अधिकारी, अर्थ-१, गृह विभाग.
२१. निवडनस्ती, पोल-३.